| MHSN060005912014 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.१३४/२०१४</u>**<br>श्री. संभाजी श्रीपती भगत वि.<br>श्री. श्रीपती गणू भगत वगैरे |
|---|---|

## निशाणी ८५ वरील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्तीकरिता तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये अत्यावश्यक पक्षकार सामील करणेकामी दाखल केला आहे. वादीचा नि.क्र.८५ वरील अर्ज वाचला.

**२.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरिता व जाहीर होऊन मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादीचे कथनानुसार प्रस्तुत दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी दावा कलम १अ मधील मिळकत गट नं.९३ या मिळकतीपैकी हे.०.८५ आर पैकी उत्तर बाजूची हे.०.४२.५० आर ची मिळकत दि.१४/०६/२०२४ रोजी रजि. नोंद दस्त क्र.३८९६/२०२४ अन्वये श्री. सखाराम मारुती जाधव व आक्काताई सखाराम जाधव यांना तथाकथित नोंद खरेदीपत्राने खरेदी दिलेली आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने वादी दाव्याच्या टायटलमध्ये त्यांना प्रतिवादी क्र.९ व १० म्हणून समाविष्ट करुन तशी दुरुस्ती करु इच्छीतात.

**३.** तसेच दाव्याचे टायटलमध्ये दावा विषयाची किंमत र.रु.२१.६८ + र.रु.२,००,०००/–+र.रु.१,०००/–+र.रु.१,०००/– नंतर **''+१,०००/– +१,०००/–''** तसेच र.रु.२,०२,०२१.६८ पैसे ऐवजी **''र.रु.२,०४,०२१.६८ पैसे''** अशी दुरुस्ती करणेस, तसेच दावा कलम ५(ब) नंतर **५(क)** असे नमुद करुन त्यामध्ये *''५क) प्रस्तुतचा दावा न्यायप्रविष्ट असताना, यातील प्रतिवादी नं.६ यांनी दावा कलम १(अ) मधील मिळकत गट नं.९३ या मिळकतीपैकी हे.०–८५ आर पैकी दक्षिण बाजूची हे.०.४२.५० आर आकार रु.०.३७ पैसे ची मिळकत दि.०४/०९/२०२३ रोजी रजिस्टर नोंद दस्त क्र.५९८२/२०२३ अन्वये श्री. सखाराम मारुती जाधव व आक्काताई सखाराम जाधव यांना तथाकथित नोंद खरेदीपत्राने खरेदी दिले असलेचे तसेच प्रतिवादी नं. ७ व ८ यांनी दावा कलम*

*१(अ) मधील मिळकत गट नं.९३ या मिळकतीपैकी हे.०.८५ आर पैकी उत्तर बाजूची हे.०.४२.५० आर ची मिळकत दि.१४/०६/२०२४ रोजी रजिस्टर नोंद दस्त क्र.३८९६/२०२४ अन्वये श्री. सखाराम मारुती जाधव व आक्काताई सखाराम जाधव यांना तथाकथित नोंद खरेदीपत्राने खरेदी दिली असलेचे यातील वादी यांना नुकतेच समजून आलेले आहे. तथाकथित दोन्ही खरेदीपत्रे पोकळ व मुलतः बेकायदेशीर असून ते वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाहीत असे जाहीर होऊन मिळणेकरिता सदरचा दावा दाखल केलेला आहे.''* असा मजकूर समाविष्ट करणेकरिता, तसेच दावा कलम ८ मधील ७ व्या ओळीमध्ये १,०००/– नंतर *"+१,०००/–+१,०००/–"* असे नमुद करणेकरिता तसेच दावा कलम ९ मध्ये "उ" नंतर **"ऊ"** असे नमूद करुन त्यामध्ये *''ऊ) यातील प्रतिवादी नं.६ व प्रतिवादी नं.७ व ८ यांनी प्रतिवादी नं.९ व १० यांना दावा कलम १(अ) मधील मिळकतीचे दि.०४/०९/२०२३ रोजी रजि. दस्त क्र.५९८२/२०२३ अन्वये व दि.१४/०६/२०२४ रोजी रजि. दस्त क्र.३८९६/२०२४ अन्वये करुन दिलेले तथाकथित दोन्ही खरेदीपत्रे बोगस, बेकायदेशीर असून ते वादीचे हिस्सेवर बंधनकारक नाहीत असे जाहीर होऊन मिळावे''* असा मजकूर समाविष्ट करणेकामी व तशी दुरुस्तीची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी यांनी सदर अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने चुकीची, रचनात्मक व बेकायदेशीर असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करणेची त्यांनी विनंती केली आहे.

**५.** प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीं विरुध्द वाटपाकरिता व जाहीर होऊन मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादी हे श्री. सखाराम मारुती जाधव व आक्काताई सखाराम जाधव यांना दावेकामी प्रतिवादी नं.९ व १० म्हणून सामील करु इच्छीतात तसेच अर्जात वर नमूद केलेप्रमाणे वादींना त्यांचे दाव्यात दुरुस्ती करावयाची आहे. सदरची दुरुस्ती ही प्रतिवादी नं.६ तसेच प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी केलेल्या तथाकथित खरेदीपत्राच्या अनुषंगाने आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ रचनेत तसेच उददेशामध्ये कोणताही बदल होणार नाही. सदर दुरुस्तीस परवानगी

दिल्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट त्यांना त्यांची बाजू मांडून बचाव घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच प्रस्तुत दावा हा वाटपाकरिता असल्यामुळे श्री. सखाराम मारुती जाधव व आक्काताई सखाराम जाधव यांना दावेकामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. तथापि, वादी मागत असलेली दुरुस्ती ही भविष्यातील दावे, प्रतिदावे टाळण्यासाठी व दाव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी दावेकामी प्रतिवादी क्र.९ म्हणून श्री. सखाराम मारुती जाधव व प्रतिवादी क्र.१० म्हणून सौ. आक्काताई सखाराम जाधव यांना सामील करुन घ्यावे.

३. वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी व तशी दुरुस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2025.04.04 17:12:45 +0530

मिरज. **(निरंजन बा. चव्हाण)**

दि. ०४/०४/२०२५ ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | $4^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj |
| Date. | : | 04.04.2025. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 04.04.2025. |
| Order uploaded on. | : | 04.04.2025. |